# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.09.2024 वार – बुधवार**

---

**<u>पाऊस</u>**

पुणे आणि परिसरात आज दुपारपासून अतिवृष्टि सुरु आहे. हवामान विभागानं दिलेल्या अंदाजानुसार उद्या देखील पुणे आणि परिसरासाठी अतिवृष्टिचा लाल बावटा फडकवण्यात आला आहे. खडकवासला साखळीतील सर्व धरणं तुडुंब भरली असल्यानं आवश्यकतेनुसार नदी पात्रात पाणी सोडण्यात येईल. त्यामुळं नागरिकांनी सतर्क राहावं असा इशारा पाटबंधारे विभागानं दिला आहे.

**<u>चिकुनगुन्या</u>**

पुण्यासह राज्यभरात चिकुनगुन्याच्या रुग्णांची संख्या वाढत असल्यानं चिकुनगुन्याच्या विषाणूत झालेला बदल तपासण्यासाठी जनुकीय क्रमनिर्धारण करण्याचा निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागानं घेतला आहे. पुण्यातील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था आणि बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात चिकुनगुन्याच्या विषाणूचं जनुकीय क्रमनिर्धारण करण्यासाठी सरकारी आणि खासगी रुग्णालयांकडून रक्त नमुने घेण्यात येणार आहेत. चिकुनगुन्याच्या रुग्णांमध्ये जीवघेणी लक्षणं दिसत असल्याचा दावा काही रुग्णालयांनी केला आहे. आरोग्य विभागाला अद्याप चिकुनगुन्याच्या रुग्णांमध्ये वेगळी लक्षणं दिसून आलेली नाहीत अशी माहिती पुणे आरोग्य विभाग सहसंचालक डॉक्टर राधाकिशन पवार यांनी दिली.

**<u>साथरोग</u>**

पुणे शहरामध्ये साथरोगांच्या रुग्णांची संख्या झपाटयानं वाढत आहे, ती नियंत्रणात आणावी, अशी मागणी पुणे महापालिकेचे माजी सभागृह नेते गणेश बिडकर यांनी महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांच्याकडं केली आहे.

**<u>स्वच्छता</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं "स्वच्छता ही सेवा" पंधरवड्याचं आयोजन करण्यात आलं आहे. या पंधरवड्यात "स्वभाव-स्वच्छता, संस्कार- स्वच्छता" यावर आधारित विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून आज स्वच्छता कर्मचाऱ्यांचं आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आलं होतं. महानगरपालिकेच्या वतीनं आरोग्य सेवकांसाठी आवश्यक ती साधनं पुरविण्यात आलेली असून त्यांचं

आरोग्य उत्तम राहावं यासाठी वर्षातून दोन वेळा त्यांच्यासाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केलं जातं, त्यांना आवश्यकतेनुसार वैद्यकीय उपचार, मार्गदर्शन आणि तज्ञांचा सल्ला देण्यात येतो, त्यामुळं त्यांचं आरोग्य निरोगी राहून त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत होते, असं मत आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉक्टर लक्ष्मण गोफणे यांनी व्यक्त केलं.

**<u>आरटीओ</u>**

राज्याच्या परिवहन म्हणजे आरटीओ कर्मचारी संघटनेनं बेमुदत संपाला सुरुवात केली आहे. या संपामुळं पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि बारामती आरटीओ कार्यालयांमधील वाहन चालक परवाना नूतनीकरण, वाहन हस्तांतरण आदींसह कार्यालयीन कामकाजावर मोठा परिणाम झाला आहे. आकृतीबंधाच्या योग्य अंमलबजावणीसह वर्षानुवर्षं प्रलंबित मागण्यांकडं शासनाचं लक्ष वेधण्यासाठी आरटीओ कर्मचारी संघटनेनं कालपासून बेमुदत संपाला सुरुवात केली आहे.

**<u>एसटी</u>**

प्रवासी वाहतूक करीत असतांना महामंडळाचं उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीनं जास्तीत जास्त उत्पन्न आणणाऱ्या चालक आणि वाहक यांना एसटीतर्फे रोख प्रोत्साहन भत्ता देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक फेरीचं उत्पन्नाचं उद्दिष्ट देऊन ते उद्दिष्ट पूर्ण करुन अतिरिक्त उत्पन्न आणणाऱ्या चालक आणि वाहकांना उद्दिष्टापेक्षा वाढीव उत्पन्नापैकी 20 टक्के रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून दोघांना सम प्रमाणात वाटण्यात येणार आहे. ही रक्कम त्यांची कामगिरी संपवून आगारात आल्यानंतर त्याच दिवशी रोख  स्वरूपात मिळणार आहे.

**<u>जल्लोष</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत विद्यार्थी विकास मंडळातर्फे प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज चिंचवड यांच्याद्वारे संयुक्तपणे 'जल्लोष 2024 युवक महोत्सव' या विभागीय अंतर महाविद्यालयीन स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी बोलताना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी वेगवेगळ्या कलागुणांच्या माध्यमातून स्पर्धकांनी आपल्या अंगीभूत कला सादर करून स्वतःला व्यक्त केले आणि सहभाग घेतल्याचा आनंद अनुभवला असं सांगितलं. जल्लोष 2024 युवक महोत्सवात विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या पिंपरी चिंचवड, मावळ, खेड, आंबेगाव आणि जुन्नर या तालुक्यातील 57 महाविद्यालयातील अकराशेहून अधिक विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन केलं.

**<u>दाखले</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्राच्या माध्यमातून यावर्षी 1 एप्रिल ते 23 सप्टेंबर या कालावधीत 36 हजार 538 दाखले काढण्यात आले आहेत, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी दिली. महापालिकेच्या वतीनं नागरी सुविधा केंद्रांच्या माध्यमातून विविध प्रकारची प्रमाणपत्रं,

परवाने आदी सेवा प्रदान केल्या जात आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत महापालिकेच्या वतीने एकंदर 94 नागरी सुविधा केंद्रं उभारण्यात आली आहेत.

**<u>मुंबा आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव</u>**

आशय फिल्म क्लब, फिल्म फेस्टीवल कंपनी आणि अभिजात फिल्म सोसायटी यांच्याद्वारे संयुक्तपणे आयोजित चौथ्या 'मुंबा आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवा'चं उद्घाटन आज अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते झालं. शनिवार 28 सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात 81 लघुपट पहाण्याची सुवर्णसंधी चित्रपट रसिकांना मिळणार आहे.

**<u>पाडकाम</u>**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून पवना, मुळा आणि इंद्रायणी या तीन नद्यांच्या निळ्या पुररेषेतील अनधिकृत व्यावसायिक बांधकामावर महापालिकेकडून कारवाई सुरु आहे. आतापर्यंत 37 हजार चौरस फूट क्षेत्र मोकळं करण्यात आलं असून ही कारवाई सुरुच राहणार आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**